अति.महापालिका आयुक्त(ज) कार्यालय,
आस्थापना विभाग,पुणे मनपा.
जा.क्र. :-अतिमआ/साप्रवि/आस्था/७४२२
दिनांक :- १६/०१/२०२१

## -: कार्यालयीन आदेश :-

विषय :- पुणे महानगरपालिका मेडिकल एज्युकेशन ट्रस्ट अंतर्गत सुरु करण्यात येणाऱ्या भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी वैद्यकीय महाविद्यालयाकरिता तात्पुरत्या स्वरुपातील पदभरतीसाठी सेवक उपलब्ध करुन देणेबाबत.
संदर्भ :- मा.अतिरिक्त महापालिका आयुक्त(ज) ठ.क्र.१/५४६, दि.१६/०१/२०२१

पुणे महानगरपालिका मेडिकल एज्युकेशन ट्रस्ट अंतर्गत सुरु करण्यात येणाऱ्या भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी वैद्यकीय महाविद्यालयाकरिता पदे केवळ तात्पुरत्या स्वरुपात भरणेसाठी जाहीर प्रकटन केले आहे. त्यानुषंगाने भरती प्रक्रियेच्या संपूर्ण कामकाजासाठी पुणे महानगरपालिकेकडील सेवकांची या कार्यालयीन आदेशान्वये प्रशासकीय कामकाजाच्या सोयीसाठी मेडिकल कॉलेज कक्षाकडे पुढील आदेश होईपर्यंत खालीलप्रमाणे कामकाजाची व्यवस्था करण्यात येत आहे.

| अ.क्र. | सेवकाचे नाव व हुद्दा | सध्याचे खाते | प्रत्यक्ष कामाचे ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | श्री.देवकर नितीन मारुती<br>उप अधिक्षक | पथ विभाग | मेडिकल कॉलेज कक्ष,<br>तळमजला,<br>पुणे महानगपालिका<br>नविन इमारत |
| २ | श्री.सचिन वसंतराव घोरपडे<br>वरिष्ठ लिपिक | बांधकाम विभाग | |
| ३ | श्री.हिम्मत वसंत आखाडे<br>वरिष्ठ लिपिक | मालानि:सारण, देखभाल व दुरुस्ती विभाग | |
| ४ | श्री. राम श्रीरंग खरात,<br>लिपीक टंकलेखक | उद्यान विभाग | |
| ५ | श्री.अंगद रावसाहेब झोंबाडे,<br>लिपिक टंकलेखक | पाणी पुरवठा विभाग | |
| ६ | श्री.दिनेश वसंतराव कुलथे,<br>लिपिक टंकलेखक | भवन रचना विभाग | |
| ७ | श्री.संजीव बाळकृष्ण आबदार,<br>लिपिक टंकलेखक | मुख्य लेखा व वित्त विभाग | |
| ८ | श्री. सुरज राजेंद्र गायकवाड,<br>शिपाई | पथ विभाग | |

वरील सेवकांस या कार्यालयीन आदेशान्वये स्तंभ क्र.४ येथील नेमून दिलेल्या ठिकाणी प्रत्यक्ष कामासाठी हजर होणेकरीता कार्यमुक्त करण्यात येत आहे.

वरील सेवकाचे महिनेमहाचे वेतन स्तंभ क्र.३ येथील सध्याचे नेमणूक खात्याने आदा करावयाचे आहे.

उपरोक्त सेवकांनी उप आयुक्त, सामान्य प्रशासन विभाग यांचे नियंत्रणाखाली कामकाज करावयाचे असून, त्यांची महिनेमहाची हजेरी डॉ.अंजली साबणे, सहाय्यक आरोग्य अधिकारी यांचे नियंत्रणाखाली स्थापन करण्यात आलेल्या कक्षाकडून पाठवावयाची आहे.

तरी संबंधीत खातेप्रमुख / विभाग प्रमुख यांनी पुढील योग्य ती तजवीज करावी .

(रुबल अग्रवाल)
अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज)
पुणे महानगरपालिका

प्रत /-संबंधीत खातेप्रमुख/प्रशासन अधिकारी, पुणे महानगरपालिका
यांजकडेस माहिती व पुढील तजवीजीसाठी रवाना...